**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात ५८ मतदारसंघांमधे संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८ टक्के, तर पश्चिम बंगालमधे विक्रमी ७८ टक्के मतदान
- सातव्या टप्प्यातल्या निवडणुकीचा प्रचार शिगेला / निवडणूक म्हणजे लोकशाहीतला मोठा उत्सव आणि भावी पिढ्यांच्या मनात लोकशाहीची मूल्यं रुजवण्याची एक संधी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल येत्या सोमवारी ऑनलाइन जाहीर होणार
- ७७ व्या कान चित्रपट महोत्सवात अनसूया सेनगुप्ता यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार

  **आणि**
- दक्षिण कोरियात झालेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय महिला संघानं पटकावलं सुवर्ण पदक /आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी उद्या सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात लढत

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी आज देशातल्या सहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या ५८ मतदारसंघांमधे संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८ टक्के मतदान झालं. उत्तर प्रदेशातल्या १४, हरियाणातल्या सर्व १०, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये प्रत्येकी आठ, दिल्लीत सर्व ७, ओदिशामधल्या सहा, झारखंडमधल्या ४ आणि जम्मू काश्मीरमधल्या एका मतदारसंघासाठी हे मतदान झालं.

यात पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक **७८** टक्के इतकं मतदान झालं आहे.

**इतर राज्यांमधलं मतदान असं आहे…**

झारखंड अंदाजे **६१** टक्के

उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये प्रत्येकी **५२** टक्क्यांपेक्षा जास्त

हरियाणामध्ये **५६** टक्के

जम्मू काश्मीरमध्ये **५१** टक्क्यांपेक्षा जास्त

दिल्लीमध्ये **५४** टक्के

ओदिशामध्ये **५९** टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं आहे.

या टप्प्यात भाजपाचे ज्येष्ठ नेते धर्मेंद्र प्रधान, मनोहरलाल खट्टर, मनेका गांधी, मनोज तिवारी, तसंच काँग्रेसचे नेते दीपेंदर सिंह हुड्डा, कुमारी शैलजा, राज बब्बर आणि कन्हैय्या कुमार, जम्मू काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती, समाजवादी पार्टीचे नेते धर्मेंद्र यादव यांच्यासह ८८९ उमेदवारांचं भवितव्य मतदानयंत्रात बंद झालं.

**<><><><><>**

निवडणूक म्हणजे लोकशाहीतला मोठा उत्सव आणि भावी पिढ्यांच्या मनात लोकशाहीची मूल्यं रुजवण्याची एक संधी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. डीडी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत ते आज बोलत होते. सरकार किंवा राजकीय पक्षांनी त्यांच्या कामाचा हिशेब जनतेला द्यावा, असं मत त्यांनी व्यक्त केलं. निवडणूक म्हणजे लोकांना भेटण्याची एक प्रकारची संधी आहे असं मी मानतो. कोणत्याही प्रकारची टीका आपण गांभीर्यानं घेतो असंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यातल्या निवडणुकीचा प्रचार आता शिगेला पोचला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज उत्तर प्रदेशातल्या गाझीपूर इथल्या प्रचारसभेत काँग्रेसला लक्ष्य केलं. काम पुढं ढकलणं, नागरिकांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवणं यात काँग्रेस निष्णात आहे.

काँग्रेसमुळेच आपल्या वीर जवानांना एक पद, एक निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेता आला नाही, राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं ही योजना अंमलात आणली, असं मोदी म्हणाले. अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागास प्रवर्गांच्या आरक्षणाला कोणत्याही परिस्थितीत धक्का लागणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

तत्पूर्वी प्रधानमंत्र्यांनी बिहारच्या काराकाट इथं प्रचारसभेला संबोधित केलं. काँग्रेस आणि इंडीया आघाडीकडे व्हिजन अर्थात दूरदृष्टी नाही, तर फक्त कन्फ्यूजन अर्थात गोंधळ आहे, अशी टीका त्यांनी केली. बक्सार इथंही प्रधानमंत्र्यांची प्रचारसभा झाली.

राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांची आज नालंदा लोकसभा मतदारसंघात अस्थावा इथं इंडीया आघाडीच्या उमेदवाराच्या समर्थनार्थ प्रचारसभा झाली. लोकसभा निवडणुकीतल्या मूळ मुद्द्यांवरून भाजपाला लोकांचं लक्ष दुसरीकडे वळवायचं आहे, असा आरोप यादव यांनी या सभेत बोलताना केला.

जनता दल संयुक्तचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आरा लोकसभा मतदारसंघातल्या अगियांव इथं राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारासाठी प्रचार सभा घेतली.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज सालेमपूर, बलिया आणि चांदौली इथं भाजपाच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ सभांना संबोधित केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या १० वर्षांमध्ये दहशतवाद आणि नक्षलवादाचा बीमोड झाल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं.

बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती यांनी गोरखपूर इथं प्रचारसभा घेतली. काँग्रेसची चुकीची धोरणंच त्यांच्या अधोगतीला कारणीभूत असल्याचं त्या म्हणाल्या. भाजपानं भांडवलवादी आणि श्रीमंतांना मदत केल्याची आणि गरिबांकडे

दुर्लक्ष केल्याची टीका त्यांनी केली. समाजवादी पक्षाचं सरकार असताना अनुसूचित जाती, जमातीच्या नागरिकांना बढतीत मिळणारं आरक्षण रद्द झाल्याचं त्यांनी सांगितलं.

काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी गोरखपूर इथं एका प्रचारसभेला संबोधित केलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळं देशात महागाई आणि बेरोजगारी वाढल्याचा आणि यामुळे सामान्य नागरिकांना समस्यांचा सामना करावा लागत असल्याचा आरोप प्रियांका गांधींनी केला. पूर्वांचलमधल्या बहुतांश जागांमधलं वातावरण पाहता यंदा विरोधी आघाडीच सत्तेत येईल, असा दावा अखिलेश यादव यांनी केला.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या पाच टप्प्यांमधल्या मतदारांचा अंतिम आकडा निवडणूक आयोगानं आज प्रसिद्ध केला. मतदानाची आकडेवारी आधीपासूनच उमेदवारांकडे असल्याचं आयोगानं स्पष्ट केलं. या पाच टप्प्यांमध्ये ५० कोटी ७२ लाखांपेक्षा जास्त मतदारांनी आपला हक्क बजावल्याचंही आयोगानं नमूद केलं.

मतदानाची आकडेवारी उपलब्ध करून देण्यात कोणताही विलंब होत नसल्याचं, तसंच प्रत्येक टप्प्यातल्या मतदानाच्या दिवशी सकाळी साडेनऊ वाजल्यापासून व्होटर टर्नआऊट या ॲपवर ही माहिती उपलब्ध असल्याचंही आयोगानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळानं मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल २७ मे, म्हणजे येत्या सोमवारी दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर केला जाणार आहे.

मंडळाच्या maha **h** sscboard.in या संकेतस्थळावर हा निकाल विद्यार्थ्यांना पाहता येईल. गुणपडताळणीसाठी आणि गुणपत्रिकेच्या छायाप्रतींसाठी २८ मे २०२४ ते ११ जून २०२४ या काळात मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनं अर्ज सादर करता येतील.

**<><><><><>**

७७ व्या कान चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार अभिनेत्री अनसूया सेनगुप्ता यांना मिळाला. कान चित्रपट महोत्सवात हा पुरस्कार पटकावणाऱ्या त्या पहिल्या भारतीय आहेत. बल्गेरियाचे चित्रकर्मी कॉन्स्टान्टिन बोजानोव्ह यांनी लिहिलेल्या आणि दिग्दर्शित केलेल्या 'द शेमलेस' या चित्रपटातल्या भूमिकेसाठी सेनगुप्ता यांना या पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<><><><><>**

दक्षिण कोरियामध्ये झालेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय महिला संघानं सुवर्ण पदक जिंकलं आहे. ज्योती सुरेखा वेन्नम, परनीत कौर आणि आदिती स्वामी यांच्या संघानं तुर्कीएच्या संघाला अंतिम सामन्यात पराभूत केलं. दरम्यान, ज्योती आणि प्रियांश यांना मिश्र दुहेरीत अमेरिकेच्या ऑलिव्हिया डीन आणि सॉयर सुलियन यांच्याकडून पराभव पत्करावा लागल्यामुळे रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत उद्या सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात अंतिम सामना होणार आहे. चेन्नईच्या एम ए चिदंबरम स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना होईल.

**<><><><><>**

क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत आज महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत, दोन वेळा ऑलिम्पिक पदकाला गवसणी

घालणाऱ्या भारताच्या पी. व्ही. सिंधूनं थायलंडच्या बुसानन ओंगबामरूंगफान हिचा १३-२१, २१-१६, २१-१२ असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात तिचा मुकाबला सातव्या मानांकित चीनच्या वॅन्ग झी यी हिच्याशी होणार आहे.

**<><><><><>**

भारताच्या मानुष शाह आणि मानव ठक्कर या जोडीनं रिओ दे जानेरो इथं सुरू असलेल्या जागतिक टेबल टेनिस कंटेंडर स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. त्यांनी ब्राझीलच्या लुकास रोमान्स्की आणि फेलीपे डोटी यांचा ३-० अशा फरकानं पराभव केला. या जोडीचा पुढचा सामना उद्या लिलियन बार्डेट आणि ज्यूल्स रोलांड या फ्रान्सच्या जोडीशी होणार आहे.

**<><><><><>**

जपानमधल्या कोबे इथं सुरू असलेल्या पॅरा ॲथलेटिक्स जागतिक स्पर्धेत महिलांच्या २०० मीटर टी-१२ विभागात भारताच्या सिमरन शर्मानं सुवर्णपदक पटकावलं आहे. तिनं २४ पूर्णांक ९५ शतांश सेकंदाच्या वैयक्तिक सर्वोत्कृष्ट कामगिरीच्या आधारे पॅरालिम्पिक कोट्यातही स्थान पटकावलं. महिलांच्या १०० मीटर टी-३५ प्रकारात भारतीय खेळाडू प्रीती पाल हिनं कांस्य पदक पटकावलं. याच स्पर्धेत पुरुषांच्या भालाफेक एफ ४१ क्रीडाप्रकारात नवदीप यानं ४२ पूर्णांक ८२ शतांश मीटर या त्याच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीसह कांस्य पदक पटकावलं. या पदकांसह भारताची एकूण पदकसंख्या १७ झाली आहे. यात सहा सुवर्ण, पाच रौप्य आणि सहा कांस्य पदकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

कल्याणीनगर पोर्शे अपघात प्रकरणी अटक करण्यात आलेल्या अल्पवयीन आरोपीचे आजोबा सुरेंद्रकुमार अग्रवाल याला न्यायालयानं २८ मेपर्यंत पोलीस

कोठडी सुनावली आहे. गाडीच्या चालकावर गुन्हा स्वतःवर घेण्यासाठी दबाव आणल्याचा आणि त्याचं अपहरण करून डांबून ठेवल्याचा आरोप सुरेंद्रकुमार याच्यावर आहे.

**<><><><>**

डोंबिवली एमआयडीसीत अमूदान कंपनी मध्ये झालेल्या स्फा◌ेट प्रकरणात कंपनीचा मालक मलय मेहता याला आज कल्याण न्यायालयात हजर करण्यात आलं असता न्यायालयानं त्याला २९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी त्याला काल अटक केली होती.

**<><><><>**

विको कंपनीचे अध्यक्ष यशवंतराव पेंढारकर यांच्या पार्थिवावर आज सकाळी नागपूरच्या अंबाझरी घाट इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल नागपुरात वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झालं. २०१६ पासून त्यांनी विको कंपनीच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती.

**//<><><><><>//**